RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २८] गुरुवार, ऑगस्ट १३, २०२६/श्रावण २२, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३.**—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. .. | **पृष्ठे** १-४ |

दिनांक १२ ऑगस्ट, २०२६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुप्रिया धावरे,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२०१७ चा महा. ६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (चौथी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (२) मधील,- २०१७ चा महा. ६.

(१) विद्यमान परंतुकाआधी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः-

"परंतु, राज्य शासनाची किंवा केंद्र सरकारची कोणतीही संस्था किंवा भारतातील राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाची कोणतीही संस्था, जरी अशी संस्था विद्यापीठ क्षेत्राबाहेर स्थित असली तरी देखील तिला विद्यापीठाशी संलग्न करता येईल किंवा विद्यापीठाच्या विशेषाधिकाराचे लाभ देता येतीलः";

(२) विद्यमान पहिल्या परंतुकामधील, "परंतु" या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) विद्यमान दुसऱ्या परंतुकामधील, "परंतु आणखी असे की" या मजकुराऐवजी, "परंतु तसेच" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील, पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-

"(६) जेव्हा जेव्हा राज्य शासनाला असे करणे इष्ट असल्याचे वाटेल तेव्हा, राज्य शासनाला, त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत कोणत्याही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त परिसंस्थेची किंवा विद्यापीठाची आणि विद्यापीठ विभागांची तपासणी करवून घेण्याचा हक्क असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यामध्ये नवीन कलम ३५क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-

अध्ययन प्रशाला.

"**३५क.** (१) विद्यापीठामधील प्रत्येक विद्याशाखेअंतर्गत अध्ययन प्रशाला असतील.

(२) संबंधित विषयांमध्ये किंवा विषयांच्या गटांमध्ये अध्ययन व संशोधन पाठ्यक्रम चालविणारे विद्यापीठ विभाग व केंद्रे, संबंधित अध्ययन प्रशालेच्या अधिपत्याखाली कार्य करतील.

(३) संचालक हा, प्रत्येक अध्ययन प्रशालेचा प्रमुख असेल, ज्याला, विद्यापीठामध्ये प्राध्यापक किंवा सहयोगी प्राध्यापक म्हणून अध्यापन करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेल्या विभाग प्रमुखांमधून, कुलगुरूंद्वारे तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता, आळीपाळीने, नामनिर्देशित करण्यात येईल.

(४) अध्ययन प्रशालेचे कार्य व प्रशासन, अध्ययन प्रशालेच्या संचालकाचे नामनिर्देशन करण्याची कार्यपद्धती, संचालकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांसह त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मधील, "कोणतीही व्यक्ती" या मजकुराआधी, "पदसिद्ध सदस्याखेरीज" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७० मध्ये,- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७० ची सुधारणा.

(एक) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-

"(१) जेव्हा व्यवस्थापन परिषदेव्यतिरिक्त, कोणत्याही प्राधिकरणाच्या निवडून आलेल्या सदस्याचे कोणतेही पद, त्याचा सर्वसाधारण पदावधी समाप्त होण्यापूर्वी रिक्त होईल तेव्हा, असे रिक्त पद, पोट-कलम (३) अन्वये घटित केलेल्या स्थायी समितीद्वारे, जी व्यक्ती, त्याच प्रवर्गातून उक्त प्राधिकरणावर निवडून जाण्यास अन्यथा पात्र असेल अशा व्यक्तीच्या नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.".

(दोन) पोट-कलम (२) मधील, "पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या, कलम ७९ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७९ ची सुधारणा.

**७९.** (१) प्रत्येक विद्यापीठामध्ये, केंद्र सरकार, राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्थांव्यतिरिक्त, विद्यापीठांचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या सर्व प्रकारच्या गाऱ्हाण्यांवर कार्यवाही करण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी एक लोकपाल असेल. लोकपाल.

(२) लोकपाल, राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांसह राज्य शासनाविरुद्धच्या गाऱ्हाण्यांवर आणि जी गाऱ्हाणी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येतात त्या गाऱ्हाण्यांवर कार्यवाही करणार नाही आणि त्यावर निर्णय घेणार नाही.

(३) कुलगुरू, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, लोकपालाची नियुक्ती करण्यासाठी, जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या तीन सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या एका नामिकेची शिफारस करील.

(४) राज्य शासन, कुलगुरूंद्वारे शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमध्ये समाविष्ट असलेल्या एका व्यक्तीची विद्यापीठासाठी लोकपाल म्हणून नियुक्ती करील.

(५) लोकपालाची, त्याने पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या पदावधीकरिता नियुक्ती करण्यात येईल, आणि तो, आणखी एका पदावधीकरिता पुनर्नियुक्त करण्यासाठी पात्र असेलः

परंतु, लोकपाल, वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत, पद धारण करील.

(६) राज्य शासनास, गैरवर्तनाचा किंवा गैरवर्तणुकीचा दोषारोप सिद्ध झाल्यावर, लोकपालाला पदावरून काढून टाकता येईल.

(७) लोकपालाला, उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या व्यक्तीकडून यासंबंधात चौकशी केल्याखेरीज आणि लोकपालाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, पदावरून काढण्याचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(८) लोकपाल, विद्यापीठाद्वारे निर्धारित करण्यात येईल असे, पारिश्रमिक व वाहन खर्च मिळण्यास हक्कदार असेल.

(९) लोकपाल, दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या गाऱ्हाण्यांवर निर्णय करील.

(१०) लोकपाल, गाऱ्हाणे दाखल केल्याच्या दिनांकापासून, व्यवहार्य असेल तितपत, तीन महिन्यांच्या कालावधीत कायद्यानुसार गाऱ्हाण्यांची सुनावणी घेईल, ती सोडवील व त्यावर निर्णय करील.

(११) विद्यापीठ, लोकपालाला प्रशासकीय सहाय्य पुरविण्यासाठी सहायक कुलसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला विद्यापीठाचा अधिकारी प्रमुख असलेला एक कक्ष स्थापन करील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ८१ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ८१ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(एक) खंड (ख) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(ख) या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या लोकपालाच्या निर्णयाने व्यथित झालेला कोणताही पक्षकार;";

(दोन) विद्यमान परंतुकातील, "तक्रार निवारण समितीचा" या मजकुराऐवजी, "लोकपालाचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १२१ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १२१ मध्ये, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईलः-

"(९) संलग्न महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था, विद्याशाखा, पाठ्यक्रम किंवा सॅटेलाइट-केंद्र बंद झाल्यास, राज्य शासनाकडून अनुदानित पदांवर नियुक्त केलेल्या अध्यापकांच्या, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या अशा दायित्वांखेरीज, अशा बंद पडण्यामुळे बाधित झालेल्या अध्यापकांच्या, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या आस्थापना व सेवा यांमधून उद्‌भवणाऱ्या सर्व दायित्वांसाठी व्यवस्थापन सर्वस्वी जबाबदार असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३७ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३७ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "विद्यापीठाची खाजगी विद्यार्थिनी म्हणून किंवा विद्यापीठाच्या पत्रव्यवहार पाठ्यक्रमासाठी किंवा अन्य कोणत्याही बहिस्थ पदवी किंवा पदविका पाठ्यक्रमासाठी" या मजकुराऐवजी, "विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण केंद्राने सुरू केलेल्या पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनी म्हणून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.